**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 12.10.2024** **वार – शनिवार**

---

**हवामान**

पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांपासून ते पुणे शहरापर्यंत हवामान केंद्रं उभारण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनानं घेतला आहे. या केंद्रांद्वारे दर दहा मिनिटांनी आपोआप नोंदी घेतल्या जातील. नेमका किती पाऊस पडला ते कळल्यास, पाण्याचं नियोजन करणं महापालिकेला शक्य होणार आहे. यावर्षी जुलैअखेर आणि ऑगस्टच्या सुरुवातीला अतिवृष्टीनंतर धरणांमधून सोडलेल्या पाण्यानं पुण्यातील काही भाग जलमय झाले होते. अशा परिस्थितीवर मात करण्यासाठी या केंद्रांचा उपयोग होणं अपेक्षित आहे.

**टपाल**

त्रिमीती तंत्रज्ञानाचा वापर करुन महाराष्ट्रातील पहिलं टपाल कार्यालय पुण्यातील सहकारनंगरमध्ये उभारलं जाणार आहे. पुणे शहर पश्चिम विभागाचे प्रवर अधीक्षक रिपन ड्युलेट यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या कार्यालयाच्या बांधणीत त्रिमिती तंत्रज्ञानाचा वापर करुन कमीतकमी मनुष्यबळामध्ये कमी दिवसांत इमारत उभी करणे समाविष्ट आहे. यावर्षी 130 देशांमध्ये दिवाळी फराळ पाठविण्याची सुविधा केली असून फराळ साहित्य घरी येऊन घेऊन जाण्याचीही व्यवस्था असल्याचं ड्युलेट यांनी सांगितलं.

**मिळकत**

पुणे महापालिकेच्या मिळकत कर विभागातर्फे समाविष्ट 23 गावातील 87 कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. याबाबतचा निर्णय उपायुक्त माधव जगताप यांनी घेतला आहे. बदली करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना आता कर वसुलीची कामं देण्यात येणार आहेत. वसुलीसाठी पथकं तयार करण्यात आली असून क्षेत्रीय कार्यालय स्तरावर अशी 4-5 पथकं असतील अशी माहिती जगताप यांनी दिली. आपापल्या परिसरातील अधिक थकबाकी असलेल्या प्रमुख 100 लोकांची यादी तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार कर्मचाऱ्यांनी ही यादी तयार केली आहे. या

थकबाकीदारांना प्रथम दूरध्वनीद्वारे संपर्क केला जाणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष घरी जाऊन वसुली केली जाईल असं जगताप यांनी सांगितलं.

**वॉकेथॉन**

कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य चांगलं राखण्यासाठी प्रोत्साहन देणं ही काळाची गरज आहे. याची गंभीर दखल घेत कनेक्टींग ट्रस्टनं या समस्येकडं लक्ष वेधण्यासाठी वॉकेथॉनचं आयोजन केले आहे. उद्या दुपारी 4 ते 6 या वेळेत संभाजी पार्क, जंगली महाराज रोड, गुडलक चौक, फर्गसन महाविद्यालयमार्गे संभाजी पार्क अशी ही वॉकेथॉन होणार आहे. कनेक्टिंग ट्रस्टच्या संस्थापिका आणि व्यवस्थापकीय संचालक अर्णवाज दमानिया,  मुख्य कार्यकारी अधिकारी प्रणिता मडकईकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून वॉकेथॉनला सुरुवात होईल. जागतिक मानसिक आरोग्य दिनाची यंदाची संकल्पना 'कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्याला प्राधान्य' अशी आहे. पुणेकरांनी या वॉकेथॉनमध्ये सहभागी होण्याचं आवाहन संस्थेनं केलं आहे.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा 42वा वर्धापन दिन काल उत्साहात साजरा करण्यात आला. पिंपरी चिंचवड शहराचे शिल्पकार दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्याला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं. याप्रसंगी विविध क्रीडा स्पर्धा तसंच पारंपरिक खेळ आणि महिलांसाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**बोनस**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध  विभागात कंत्राटी पद्धतीनं घेण्यात आलेल्या कामगारांना दिवाळी सणासाठी मासिक वेतन आणि बोनस दिवाळीपुर्वी देण्यात यावा, तसंच विहित वेळेत बोनस न दिल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचं परिपत्रक अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी काढलं आहे.  महापालिकेच्या विविध विभागात कंत्राटी तत्वावर तसंच मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024 या कालावधीतील बोनस 24 ऑक्टोबरपूर्वी देण्यात यावा. याबाबत सर्व विभागप्रमुखांनी कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल कामगार कल्याण विभागास सादर करावा असं परिपत्रकात नमूद केलं आहे.

**साडी**

विजयादशमीनिमित्त पुण्यातील सारसबाग परिसरातील श्री महालक्ष्मी मंदिरातील देवीच्या मूर्तीला 17 किलो सोन्याची साडी परिधान करण्यात आली.  वर्षभरातून दोन वेळेस म्हणजे दसरा आणि

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी ही साडी देवीला नेसवली जाते. देवीचं हे सुवर्णवस्त्रातील रुप पाहण्याकरीता भाविकांनी गर्दी केली  होती. साडीवर आकर्षक नक्षीकाम करण्यात आलं आहे. ही सोन्याची साडी दक्षिण भारतातील कारागिरांनी तयार केलेली आहे.

**टेनिस**

सांगली इथं सुरु असलेल्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धांमध्ये पुण्याच्या खेळाडूंनी आगेकूच कायम राखली आहे. 19 वर्षाखालील गटात नील मुळे, प्रणव घोलकर आणि कौस्तुभ गिरगावकर यांनी विजय मिळवत स्पर्धेतील आव्हान कायम राखलं तर महिलांच्या गटात पुण्याच्या समृद्धी कुलकर्णीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभरात उघडीप राहिली. उद्या हलक्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान सध्या 32 अंश सेल्सियसच्या आसपास आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**